**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ०८ सप्टेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **भारताला उद्योग आणि ज्ञानाचं जागतिक केंद्र बनविण्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं आवाहन.**
2. **उपराष्ट्रपती पदासाठी उद्या होणार निवडणूक- राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडून डॉ.सी.पी.राधाकृष्णन तर इंडिया या विरोधी पक्षांच्या आघाडीकडून माजी न्यायमूर्ती बी.सुदर्शन रेड्डी यांना उमेदवारी.**
3. **नवीन नागपूर विकसित करण्यासाठी** NMRDA **आणि हुडको**, NBCC **यांच्यात करार.**
4. **मध्य नागपुरातील एम्प्रेस मिल परिसरातील ऐतिहासिक शिकस्त भिंत कोसळली**, **कोणतीही जीवित हानी नाही.**

---

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

भारताला पुन्हा एकदा उद्योग आणि ज्ञानाचं जागतिक केंद्र बनवावं असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. त्या आज नवी दिल्लीत अभियांत्रिकी निर्यात प्रोत्साहन परिषदेच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. अर्थव्यवस्था सक्षम आणि स्वावलंबी असण्याची, तसंच देशाच्या निर्यातीत वाढ होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. देशाच्या विकासात लघु, मध्यम आणि सूक्ष्म उद्योगांचं योगदान महत्वाचं असल्याचं त्यांनी सांगितलं.

***(होल्ड बाईट - राष्ट्रपती २४ सेकंद)***

***इ.पी.सी के लगभग दस हजार सदस्यों में 60% से अधिक माइक्रो, स्मॉल एंड मीडियम इंटरप्राइजेस है। ये इंटरप्राइजेस बड़ी संख्या में रोजगार के अवसर प्रदान करती है। हमारी अर्थव्यवस्था में एमएसएमई (MSME) का योगदान महत्वपूर्ण भी है और सराहनीय भी। इसी द्वारा एमएसएमई के निर्यात को बदलती परिस्थितियों के अनुरूप नई दिशा प्रदान की जाएगी।***

जागतिक स्तरावर अर्थव्यवस्था अस्थिर झाली तरी त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होऊ नये, इतकी अर्थव्यवस्था मजबूत असावी, असं राष्ट्रपती म्हणाल्या.

-----------------------------------------

उपराष्ट्रपती पदाची निवडणूक

उपराष्ट्रपती पदाची निवडणूक उद्या होणार आहे. या निवडणुकीसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडून महाराष्ट्राचे राज्यपाल डॉ.सी.पी.राधाकृष्णन यांना, तर इंडिया या विरोधी पक्षांच्या आघाडीकडून सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी सुदर्शन रेड्डी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, शिवसेना पक्षाच्या खासदारांची एक बैठक आज दिल्लीत बोलावण्यात आली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सदस्य या निवडणुकीत मतदान करतील. लोकसभेचे ५४२ आणि राज्यसभेचे २३९ सदस्य मिळून ७८१ सदस्य उपराष्ट्रपतीपदासाठी मतदान करणार आहेत. विजयासाठी ३९१ मतांची आवश्यकता आहे.

-----------------------------------------

वस्तु आणि सेवा कर

वस्तु आणि सेवा कर-जीएसटी मधल्या व्यापक सुधारणा सहकारी क्षेत्राला बळकटी देतील, उत्पादने अधिक स्पर्धात्मक होतील, उत्पादनांची मागणी वाढेल आणि सहकारी संस्थांचं उत्पन्न वाढेल, असा विश्वास सहकार मंत्रालयानं व्यक्त केला आहे. जीएसटी सुधारणा ग्रामीण उद्योजकता आणि अन्न प्रक्रिया क्षेत्रातल्या सहकारी संस्थांना प्रोत्साहन देतील आणि लाखो कुटुंबांना आवश्यक वस्तु परवडणार्या दरात उपलब्ध होतील. देशातल्या दहा कोटीहून अधिक दुग्ध उत्पादकांना या सुधारणांचा फायदा होईल, शाश्वत कृषी प्रणालींना चालना मिळेल आणि लहान शेतकर्यांना फायदा होईल, असंही मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

-----------------------------------------

वस्तू आणि सेवाकर-स्वागत

वस्तू आणि सेवाकर परिषदेनं ५६व्या बैठकीत वस्तू आणि सेवाकर रचनेच्या सु-सूत्रीकरणाला मान्यता दिली असून यापुढे फक्त ५ आणि १८ टक्के अशी दोन स्तरांत जी.एस.टी.कर आकारणी होईल. या सुधारणेचं स्वागत व्यापारी, सामान्य नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर करत आहे. ऐकूया यावर नागपूरचे अस्थिरोग शाल्यचीकीत्सक डॉ.आकाश सावजी यांची प्रतिक्रिया

***(होल्ड बाईट - डॉ.आकाश सावजी)***

***नवीन जीएसटी कर सुधारणेप्रमाणे बऱ्याच जीवनावश्यक, औषधींवरचा कर 0% करण्यात आलेला आहे. इतरही औषधं किंवा ऑपरेशनची उपकरणे, यांचाही कर बराच कमी करण्यात करण्यात आलेला आहे.याचा पेशंटला बराच मोठा फायदा***

***होईल. सर्व लोकांची सरकारविषयीची विश्वासार्हता निश्चितच वाढते आहे. अशाच पद्धतीने देशातली मेडिकल ट्रीटमेंट जितकी कमी दरात करता येईल. म्हणजे उत्तम क्वालिटी पण कमीत कमी खर्च यात मेडिकल ट्रीटमेंट होण ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे. आपण विकसिततेकडे चाललो आहोत. सरकारच्या या धोरणाचा मी खूप कौतुक करतो.***

-----------------------------------------

डॉ.मनसुख मांडवीय

तरुणांमध्ये रोजगार आणि कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी श्रम आणि रोजगार मंत्रालयानं केंद्रीय मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांच्या उपस्थितीत आज एका खासगी कंपनीशी सामंजस्य करार केला. रोजगार निर्मिती हा बळकट आणि आत्मनिर्भर भारताचा एक महत्त्वपूर्ण स्तंभ असल्याचं प्रतिपादन मांडवीय यांनी यावेळी केलं. खासगी क्षेत्राशी भागीदारी केल्यामुळे रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध होतीलच, शिवाय कृषी, सेवा आणि पायाभूत सुविधांसारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रांची प्रगती होऊन देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नॅशनल करिअर सर्व्हिस पोर्टल यात महत्त्वाची भूमिका बजावत असून आत्तापर्यंत यात ५१ लाखांपेक्षा जास्त नोंदण्या झाल्याची माहितीही त्यांनी दिली.

-----------------------------------------

वैनगंगा-नळगंगा

राज्यातील महत्त्वाकांक्षी वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाद्वारे विदर्भ आणि मराठवाडा विभागातील पाणीटंचाई दूर करण्यासोबतच शेतीला शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पाला गती देण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल १५ ऑक्टोबर पर्यंत शासनाकडे सादर करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच आर्थिक नियोजनासाठी केंद्र सरकारकडे निधी मागणीसंदर्भात पत्र पाठवून पाठपुरावा केला जाईल आणि राज्य सरकारकडून आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

-----------------------------------------

नवीन नागपूर

नवीन नागपूर विकसित करण्यासाठी NMRDA अर्थात Nagpur Metropolitan Region Development Authority आणि हुडको, NBCC अर्थात National Buildings Construction Corporation यांच्यात आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत करार करण्यात आला. नवीन

नागपूरसाठी NBCC प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार म्हणून काम करणार आहे. या प्रकल्पाअंतर्गत 1710 एकरमध्ये नवीन नागपूर क्षेत्र विकसित होणार असून 148 किमीचा नागपूर आऊटर रिंगरोड विकसित केला जाणार आहे. 11 हजार 300 कोटी रुपये हुडको देणार असून यातील 6500 कोटी नवीन नागपूरसाठी, तर 4800 कोटी रुपयातून आऊटर रिंगरोड तयार करून वाहतूक नियोजन करण्याचा मानस आहे

-----------------------------------------

एम्प्रेस मिल भिंत

मध्य नागपुरात असणाऱ्या सर्वात जुन्या एम्प्रेस मिल परिसरातील मारवाडी चाळीला लागून असलेली ऐतिहासिक शिकस्त भिंत काल रात्री ११.३० वाजताच्या सुमारास अचानक कोसळली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, भिंतीच्या मलब्याखाली दबल्या गेल्याने ४ चारचाकी वाहने क्षतिग्रस्त झाली आहेत. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी आज घटनास्थळाची पाहणी करून विद्यमान मालकाला नोटीस बजावण्याचे निर्देश दिले. १८८९ मध्ये टाटा समूहाने स्थापन केलेल्या एम्प्रेस मिलचा हा परिसर आहे. भिंतीसह नजीकच्या नाल्यावरची स्लॅबही कोसळली. चौधरी यांनी धोकादायक स्लॅबचे काम त्वरित करण्याचे आणि जुनी भिंत पडण्याचे निर्देश संबधित विभागाला दिले. या भिंत कोसळण्याच्या एका सीसीटीव्ही व्हिडिओत दोन दुचाकी वाहने त्या रस्त्याने जाताना दिसतात. पहिली दुचाकी सुखरूप पुढे गेली, तर दुसरी दुचाकी निघत असतानाच आकस्मिकरित्या भिंत कोसळल्याचे चित्र दिसते, परंतु सर्व सुखरूप बचावले आहेत.

-----------------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे

आमदार रोहित पवार यांनी “मी एका कंपनीला ९० कोटी रुपयांचा दंड माफ केला” असा आरोप केला. त्यांनी हा आरोप सिद्ध करावा, नाही तर राजकीय संन्यास घ्यावा, असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले .महसूल मंत्री बावनकुळे प्रसारमाध्यमांशी बोलत होते. त्यांनी केलेला उल्लेख हा जुना आहे. तत्कालीन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी त्या प्रकरणात केवळ स्थगिती दिली होती. कुठलाही दंड माफ केलेला नव्हता. माझ्या कार्यकाळातही कुठलाही दंड माफ झालेला नाही असं त्यांनी स्पष्ट केल.

-----------------------------------------

हवामान

विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये आज वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. बुलढाणा, वाशिम आणि वर्धा जिल्हा वगळता नागपूरसह अन्य सर्व जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी पर्जन्यमान राहण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. दरम्यान, उद्या आणि परवा हवामान सामान्य राहणार असून 11 आणि 12 सप्टेंबर रोजी चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ जिल्ह्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान नागपुरात आज सकाळपासून अधून मधून ढगाळ वातावरण असल्याने वातावरणातील उकाडा वाढला आहे. दरम्यान येत्या काही तासात, गडचिरोली जिल्ह्यात विजांच्या गडगडाटासह हलक्या सरी पडण्याची शक्यता आहे. अमरावती, यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यात देखील ठिकठिकाणी हलक्या सरी पडण्याची शक्यता आहे.

----------------------------------------

ईद-ए-मिलादची मिरवणूक

मुस्लिम बांधवांनी ईद-ए-मिलादची मिरवणूक ५ सप्टेंबर ऐवजी ९ सप्टेंबर रोजी अर्थात उद्या काढण्याचा निर्णय घेतला असून अकोला शहरातील शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. ५ सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलादची मिरवणूक तसेच ६ सप्टेंबर रोजी श्री गणेश उत्सव मिरवणूक पाठोपाठ येत असल्याने समाजात एकता अखंडता कायम राखण्यासाठी तसेच कुठलाही अनुचित प्रकार टाळण्यासाठी मुस्लीम बांधवांनी ईद-ए-मिलादुन्नबी मिरवणूक उद्या काढण्याचा निर्णय घेतला.

----------------------------------------